**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २० डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या २३ नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी शांततेत मतदान**
2. **सावकारांचे रॅकेट विदर्भ आणि मराठवाड्यात सक्रिय, आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात तपास करण्याची काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची मागणी**
3. **नागपूर मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी मनपाच्या दहाही झोनसाठी दहा वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून केली नियुक्ती**
4. **टी -२० क्रिकेट विश्व् चषक स्पर्धेच्या संघातून निवड समितीनं भारताचा उपकर्णधार शुभमन गिल ला वगळलं**

-----------------------------------------------

**मतदान**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये नगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या १४३ पदांसाठी मतदान शांततेत घेण्यात आलं. यापूर्वी, राज्यातील २६३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी दोन डिसेंबर रोजी मतदान झाले होते. या सर्व मतदानाची मतमोजणी उद्या होणार आहे अकोला जिल्ह्यातील बाळापूर नगरपरिषदेच्या अध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी मतदान झालं. गोंदिया जिल्ह्यात आज गोंदिया नगर परिषदेच्या तीन प्रभागातील तीन जागांसाठी आणि तिरोडा नगर परिषदेच्या एका प्रभागतील एका जागेसाठी मतदान झालं या आधी दोन डिसेंबरला गोंदिया आणि तिरोडा नगर परिषद तसंच गोरेगाव आणि सालेकसा या दोन नगर पंचायती करिता मतदान प्रक्रिया पार पडली यवतमाळ नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी भाजप उमेदवार असलेल्या प्रियदर्शनी उईके यांनी सहकुटुंब मतदानाचा हक्क बजाविला. त्यांचे वडील आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि आई सोबत त्या मतदान केंद्रावर पोहोचल्या.वर्धा नगर परिषद तसच बुलढाणा जिल्ह्यात देखील मतदान नीट पार पडलं

-----------------------------------------------

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

जनतेचा कौल स्पष्टपणे भाजप-महायुतीच्या बाजूने असून प्रचारादरम्यान मतदारांचा कलही त्यांच्याकडे दिसून येत आहे, त्यामुळे नगरपालिका तसेच आगामी महापालिका निवडणुकांत भाजप-महायुतीचा मोठा विजय निश्चित असल्याचे मत महसूल मंत्री व नागपूर-अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केलं.नागपूर इथं प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी यापूर्वी भाजपकडे नसलेल्या अनेक नगरपालिकाही यावेळी भाजप-महायुतीकडे येतील, असा विश्वास व्यक्त केला. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केलं -

***(होल्ड बाईट - बावनकुळे -२७ सेकंद)***

***ज्या ठिकाणी खूप जास्त कार्यकर्ते आहेत सर्व पक्ष मिळून त्यामुळे तेवढ्या सीटवर ते होऊ शकत नाही लढू शकत नाही अश्या वेळी मात्र वेगवेगळ लढण्याचं काही ठिकाणी राष्ट्रवादी काही ठिकाणी इतर महायुतीत लढताय शिवसेना भाजपा पण ज्या ठिकाणी खूप जास्त संख्या होत्या त्या ठिकाणी मात्र मैत्रीपूर्ण लढत होईल आणि त्यामुळं ज्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल त्याठिकाणी मात्र आम्ही कुठलेही मतभेद,मनवेद होणार नाही असं कुठली व्यक्तत्व आणि निवडणुकीमध्ये असं कुठलही कार्य आमच्याकडनं होणार होणार नाही.***

---------------------------------------------

**सोनिया गांधी**

मनरेगा कायदा हा ग्रामीण गरीब, वंचित आणि श्रमिकांसाठी क्रांतिकारी ठरला होता; मात्र गेल्या ११ वर्षांत मोदी सरकारने तो कमकुवत केल्याचा आरोप काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी केला आहे. महात्मा गांधींचे नाव वगळून आणि कोणतीही चर्चा न करता मनरेगाची रचना बदलणे म्हणजे ग्रामीण गरीबांच्या रोजगाराच्या अधिकारावर हल्ला असून काँग्रेस या कायद्याविरोधात ठामपणे लढणार असल्याचे तिन्ही स्पष्ट केलं

---------------------------------------------

**नॅशनल हेराल्ड**

ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयानं नॅशनल हेराल्ड प्रकरणी आरोपपत्र फेटाळण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यासह इतरांवर ईडीनं आरोपपत्र दाखल केलं होतं. दिल्लीतल्या राऊज अव्हेन्यू न्यायालयानं हे आरोपपत्र फेटाळलं होतं मात्र याप्रकरणी तपास सुरू

ठेवण्याची मुभा दिली होती. आरोपपत्र फेटाळण्याच्या या निर्णयाला स्थगिती देण्याची ईडीची मागणी आहे.

---------------------------------------------

**विजय वडेट्टीवार**

चंद्रपूर इथल्या शेतकरी रोशन कुडे याला सावकाराकडून घेतलेल्या एक लाख रुपयांच्या कर्जापोटी तब्बल ७४ लाखांचा बोजा लादून किडनी विकण्यास भाग पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. अशा प्रकारचे किडनी विक्रीचे मोठे रॅकेट महाराष्ट्रात सक्रिय असून विदर्भ व मराठवाड्यात वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके नेमून चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.-

***(होल्ड बाईट -विजय वडेट्टीवार २४ सेकंद)***

***हे फार मोठं नेटवर्क आहे सावकारांचा आणि शेतकऱ्यांना पूर्ण जमीन हडपून त्यांना व्याजाने पैसे देऊन त्यांना चक्रवाळ व्याज लावून वारंवार म्हणजे या पोरांच्याकडून दर एक लाख चे कर्ज घेतले आणि त्याला चौऱ् याहत्तर लाख मोजूनही कदाचित सर्वच जमीन विकूनही या तरुण शेतकर्यांना सोडलं नाही आणि म्हणून आज नक्कीच यातून. जी एस . आय. पी. नेमली त्या एस . आय. पी च्या चौकशीच्या माध्यमातून सत्य बाहेर येईल.***

या प्रकरणात सरकारने केवळ एसआयटी नेमणे पुरेसे नसल्याचे सांगत, दोषी सावकार, एजंट व डॉक्टरांवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली. तसेच महायुती सरकारच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांवर किडनी विकण्याची वेळ आल्याची टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

---------------------------------------------

**निवडणूक कार्यक्रम**

राज्य निवडणूक आयोगाने नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५चा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून, येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मनपाच्या दहाही झोनसाठी दहा वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व राज्य निवडणूक आयोगाच्या १५ डिसेंबर २०२५ च्या निर्देशानुसार या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.लक्ष्मीनगर, धरमपेठ, हनुमाननगर, धंतोली, नेहरूनगर, गांधी महाल, सतरंजीपुरा, लकडगंज, आशीनगर आणि मंगळवारी या दहा झोनमधील एकूण विविध प्रभागांसाठी निवडणूक होणार आहे.प्रत्येक झोनमध्ये निवडणूक निर्णय

अधिकारी व सहाय्यक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, झोनचे सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नामनिर्देशनपत्रे मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ ते सोमवार दि. २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारली जाणार आहेत.तसेच मंगळवार दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत नामनिर्देशन स्वीकारण्यात येणार आहे.गुरुवार दि. २५ डिसेंबर व रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नसल्याची माहिती मनपाने दिली आहे.

-----------------------------------------------

**महिला मतदार**

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी विवाहित महिला उमेदवारांनी उमेदवारी अर्जावर मतदार यादीमध्ये नोंद असलेलेच नाव नमूद करावे, असे स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. लोकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी आयोगाने ही माहिती जाहीर केली आहे.

-----------------------------------------------

**क्रिकेट संघ निवड**

टी -२० क्रिकेट विश्व् चषक स्पर्धेच्या संघातून निवड समितीनं भारताचा उपकर्णधार शुभमन गिल याला वगळलं आहे. सूर्यकुमार यादव कडे कर्णधारपद कायम ठेवण्यात आलं आहे. राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी आज १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. त्याच्या जागी अष्टपैलू अक्षर पटेल याला उपकर्णधार पद देण्यात आलं आहे. ईशान किशन आणि रिंकू सिंग यांना संघात स्थान पुन्हा स्थान मिळालं आहे.

-----------------------------------------------

**आशिया करंडक क्रिकेटस्पर्धा**

१९ वर्षांखालील आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत उद्या अंतिम फेरीत भारत आणि पाकिस्तान यांच्यात दुबईत सामना होईल. उपांत्य सामन्यात श्रीलंकेला हरवून भारतानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पावसामुळं कालचा उपांत्य सामना २० षटकांचा झाला. श्रीलंकेनं विजयासाठी दिलेलं १३९ धावांचं आव्हान भारतीय संघानं १८ व्या षटकात केवळ दोन गडी गमावून पूर्ण केलं. दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानच्या संघानं बांग्लादेशवर आठ गडी राखून विजय मिळवला.

-----------------------------------------------

**हवामान**

विदर्भात आज गोंदिया जिल्ह्यात ८. २ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. तर नागपुरात ८. ६ अंश सेल्सिअस आणि यवतमाळ इथं ९ अंश सेल्सियस सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान दिल्ली आणि एनसीआरमध्ये आज सकाळपासून दाट धुक्यामुळे दृश्यमानता शून्यावर आली असून रस्ते आणि हवाई वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर येणारी ६६ व जाणारी ६३ अशी एकूण सुमारे १३० उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

-----------------------------------------------

**वेळापत्रक**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिवाळी -२०२५ लेखी परीक्षेची वेळापत्रकेविद्यापीठाच्या https://www.nagpuruniversity.ac.in

या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील दि. १४ जानेवारी २०२६, १५ जानेवारी २०२६, १६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या हिवाळी २०२६ लेखी परीक्षांचे पेपर नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीमुळे रद्द करण्यात आले आहे. परीक्षा यापूर्वीच्या नमूद केलेल्या वेळापत्रकातील वेळेनुसार नियोजित परीक्षा केंद्रावर सुधारित वेळापत्रकानुसार घेतली जाणार आहे.

-----------------------------------------------